# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा

**डॉ. आर. एन. काटकर**
अधिष्ठाता तथा सहयोगी अधिष्ठाता

ई-मेल-adlae@pdkv.ac.in
भ्रमणध्वनी क्र.-८२७५०३५२५५


क्रं.सअ / निकृशि /प्रवेश/ १७० /२०२५
दिनांक - २१/०५/२०२५

प्रती,

**प्रभारी अधिकारी**
**माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम, अकोला/नागपूर/अचलपूर/काटोल**

**विषय : माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ च्या सूचनेस प्रसिद्धी देणेबाबत....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, **माळी प्रशिक्षण** अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दिनांक **०२/०६/२०२५** पासून ऑनलाइन पद्धतीने सुरू होत असून सदर प्रवेश प्रक्रिया जाहिरात विद्यापीठामार्फत विदर्भ स्तरावर प्रसिद्धीसाठी देण्यात आली आहे.

तरी आपणास सूचित करण्यात येते की, **आपल्या स्तरावर सुद्धा सदर जाहिरातीस आपल्या भागातील वृतपत्र/व्हॉटप्स ग्रुप/स्थानिक केबल नेटवर्क, इत्यादि मार्फत जास्तीत जास्त प्रसिध्दी देऊन सदर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेची माहिती सर्व गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल याची व्यवस्था करावी. जेणेकरून विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याची संधी मिळेल. करिता जाहिरातीची प्रत आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडलेली आहे.**

**आपल्या स्तरावर प्रसिद्धी दिल्यानंतर सदर जाहिरातीचे कात्रण तसेच अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रीये संबंधी प्रसिद्धीसाठी घेतलेल्या विवध उपक्रम बाबत आपला सविस्तर अहवाल या कार्यालयात विनाविलंब दिनांक १०/०७/२०२५ पूर्वी सादर करावे, जेणेकरून वरिष्ठ स्तरावर सदर अहवाल आम्हाला वेळीच सादर करणे सोयीचे होईल.**

तरी पुढील त्वरित कार्यवाही करिता रवाना.

टीप : **या वेळी प्रवेश अर्ज भरण्यास भरपूर कालावधी दिला असल्याने नियमित प्रवेश फेरीनंतर पुढे कोणतीही अतिरिक्त प्रवेश फेरी होणार नाही याची नोंद घ्यावी.**

**सोबत : १. जाहिरातीची प्रत**

अधिष्ठाता तथा सहयोगी अधिष्ठाता
निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा
डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला

**प्रतिलिपी.**

१) मा. संचालक (शिक्षण), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीती करिता सविनय सादर.
२) मा. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीती करिता.
३) मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू यांचे अवलोकनार्थ.
४) प्रभारी अधिकारी, कृषि माहिती तंत्रज्ञान प्रणाली केंद्र, डॉ. पं.दे. कृ. वि., अकोला यांना माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम, २०२५-२६ च्या ऑनलाइन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकरिता माहिती पुस्तिका, जाहिरात विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणे करिता